# प्र सि द्धी प त्र क

मानधन तत्वावर "मोडी लिपीतील मजकुराचे मराठीमध्ये लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीमध्ये अनुवाद" करणाऱ्या मोडी लिपी अनुवादकांची नामिका स्थापन करण्यासाठी भाषा संचालनालयामार्फत दिनांक २५.०६.२०२६ रोजी प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. मोडी लिपी नामिकेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मोडी लिपी तज्ज्ञांना दिनांक २५.०८.२०२६ रोजीपर्यंत अर्ज सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. सदर मुदत दिनांक २५.०८.२०२६ रोजी संपुष्टात आली आहे.

तथापि, राज्यातील विविध भागातून आलेली मागणी विचारात घेऊन तसेच जास्तीत जास्त मोडी तज्ज्ञांना या प्रक्रियेत सहभागी होता यावे यादृष्टीने अर्ज सादर करण्यास दिनांक २५.१२.२०२६ पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे. ज्यांनी यापूर्वी अर्ज केलेले नाहीत अशा इच्छुक मोडी लिपी तज्ज्ञांनी/लिप्यंतरकारांनी दिनांक २५.१२.२०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करावेत. दिनांक २५.१२.२०२६ नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच, भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळाच्या पत्त्यामध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे, याची देखील कृपया नोंद घेण्यात यावी. मोडी नामिकेसंबंधीचा सर्व तपशील यापुढे पुढील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

| **नवीन संकेतस्थळ** |
|---|
| https://directorate-marathi.maharashtra.gov.in/ |

(अरुण वा.गिते)
**भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.**

**दिनांक :- १८ सप्टेंबर, २०२६**

# प्र सि द्धी प त्र क

भाषा संचालनालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

मानधन तत्वावर "मोडी लिपीतील मजकुराचे मराठीमध्ये लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीमध्ये अनुवाद" करणाऱ्या मोडी तज्ज्ञ अनुवादकांची नामिका स्थापन करण्याबाबत.

विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन या कार्यालयामार्फत ३० मोडी लिप्यंतरकारांची निवड करण्यात आली आणि मराठी भाषा विभागाच्या दिनांक २७ मे, २०२६ रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे ३० मोडी लिप्यंतरकारांची नामिका स्थापन करण्यात आली. राज्यभरातून मोडी लिप्यंतरकारांची वाढती मागणी आणि मोडी लिप्यंतरकारांकडून नामिकेत समाविष्ट करण्यासाठी प्राप्त झालेली निवेदने व विनंती अर्ज विचारात घेता, मोडी लिप्यंतरकारांची नामिका विस्तारित करण्याच्या व नामिकेमध्ये अधिक संख्येने मोडी लिप्यंतरकारांचा समावेश करण्याच्या दृष्टीने, दिनांक २५.०६.२०२६ च्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिनांक २५.०८.२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. तथापि, राज्याच्या विविध विभागातून मोडी लिप्यंतरकाराकडून आलेली मागणी विचारात घेऊन आणि जास्तीत जास्त मोडी लिप्यंतरकारांचा नामिकेत समावेश करण्यासाठी अर्ज सादर करण्यास दिनांक २५.१२.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व अनुभव यासह अन्य अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:-

१) अनुवादकास प्रशासकीय, कायदेविषयक, वैद्यकीय, महसूल, शैक्षणिक, अभियांत्रिकी, इत्यादी अभिलेखांच्या व कागदपत्रांच्या मोडी मजकुराचे मराठी लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजी भाषेत अनुवाद करण्याचा अनुभव असावा.

२) मोडी तज्ज्ञ अनुवादकास मोडी लिपीचे आणि इंग्रजी व मराठी विषयांचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) ज्या व्यक्तींनी उपरोक्त एक किंवा अनेक विषयांमध्ये स्वत: मोडीतून मराठीत लिप्यंतर आणि/किंवा इंग्रजीत अनुवाद करून पुस्तके प्रकाशित केली आहेत अशा व्यक्ती देखील अर्ज करू शकतात.

४) अनुवादकास पुरेसे संगणक ज्ञान आवश्यक आहे. अनुवादकांकडे इंटरनेटसह संगणकाची सुविधा असावी.

५) मोडी लिपीतील ज्ञानासाठी तसेच इंग्रजी व मराठी भाषेतील ज्ञानासाठी शासन मान्यता प्राप्त संस्थेतील किंवा महाविद्यालयातील किंवा विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी/पदवी/अनुवाद पदविका अभ्यासक्रम किंवा पाठ्यक्रम प्रमाणपत्र असलेले उमेदवार देखील यासाठी अर्ज करू शकतात.

६) नामिकेवर घेतलेल्या मोडी तज्ज्ञ अनुवादकांना, शासनाच्या विविध विभाग, मंडळे, महामंडळे यांच्याकडून अनुवादांची कामे परस्पर पाठविण्यात येतील तसेच संबंधित विभाग व कार्यालय आणि मोडी तज्ज्ञ अनुवादक यांच्यामध्ये ठरविण्यात येईल अशा मुदतीत ही कामे विहित मुदतीत पूर्ण करून देणे ही नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांची जबाबदारी असेल.

७) नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांनी अनुवादाचे काम समाधानकारक पूर्ण करून दिल्यावर, शासन वेळोवेळी निश्चित करील त्या दरानुसार काम देणाऱ्या विभागाकडून किंवा कार्यालयाकडून किंवा संस्थेकडून अशा अनुवादकांना मानधन प्रदान करण्यात येईल.

८) मोडी तज्ज्ञ अनुवादकाने अनुवादित केलेल्या अनुवादाच्या अचूकतेची व अर्थपूर्णतेची जाबाबदारी सर्वस्वी संबंधित अनुवादकाची राहील.

९) मोडी अनुवादकांनी, त्यांच्या कामाचा सहामाही अहवाल अनुक्रमे, दरवर्षी १५ जुलै व १५ जानेवारीपर्यंत विहित नमुन्यात या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक राहील.

१०) मोडी लिपीतील मजकुराच्या लिप्यंतराच्या व अनुवादाच्या कामातील अचूकता, कार्यक्षमता व कार्यतत्परता याचा आढावा घेऊन नामिकेतील मोडी तज्ज्ञ अनुवादकांना वगळण्याचा तसेच नवीन मोडी तज्ज्ञ अनुवादकांचा नामिकेत समावेश करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

ज्या मोडी लिप्यंतरकारांनी यापूर्वी अर्ज पाठविलेले नाहीत अशा इच्छुक मोडी लिपी तज्ज्ञांनी/लिप्यंतरकारांनी आपले अर्ज, मोडी लिपीतील पात्रता व अनुभव विषयक मूळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह भाषा संचालनालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ या पत्त्यावर किंवा या कार्यालयाच्या bhashasanchalak@yahoo.in या ईमेलवर किंवा टपालाने दिनांक २५.१२.२०२६ पर्यंत पाठवावेत. या मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(अरुण बा.गिते)
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

दिनांक :- १८ सप्टेंबर, २०२६